जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक १८.०७.२०२५**

'' अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या आरोपींस अटक ''

अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे यांना मिळालेल्या माहिती वरून त्यांचे पथकाने एकुण ०४ ठिकाणी छापा कारवाई केल्या असुन त्यामध्ये एकुण ४ गुन्हे नोंद करण्यात आले आहे. सदर कारवाईमध्ये १५७.३ ग्रॅम एम.डी हा अंमली पदार्थ व ४१ किलो ९७४ ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ जप्त करून एकुण ५४,४६,०४०/- रू. किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन खालील प्रमाणे वेगवेगळ्या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये कारवाई करण्यात आलेली आहे.

१) भाल गुरुकुल हायस्कुल जवळ, सिताराम म्हात्रे नगर, चिकणघर विट भट्टी जवळ, हाजी मलंग रोड, ता. उल्हासनगर, जिल्हा ठाणे येथे आरोपी नामे जय संजय रेवगडे याने आपले ताब्यात १२,७२,०००/- रू. किमतीचा ६३.६ ग्रॅम वजनाचा 'एमडी Mephedron' हा अंमली पदार्थ व आरोपी नामे साहील किरण कांगणे याने आपले ताब्यात ४,३०,०००/- रू. किमतीचा २१.५ ग्रॅम वजनाचा 'एमडी डमचीमकतवद' हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगला आहे. सदरबाबत हिललाईन पोलीस स्टेशन, उल्हासनगर येथे गुन्हा नोंद क्रमांक ३६६/२०२५ एन. डी. पी. एस. ॲक्ट ८(क), २२(क),२९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

२) दिनांक ०७/०७/२०२५ रोजी २२.३० वा.चे सुमारास स्वामी विवेकानंद विदयामंदीर शाळेसमोर, रामचंद्रनगर, डोंबिवली (पुर्व) जि. ठाणे येथे आरोपी नामे कल्पेश गणेश निंबाळकर याने आपले ताब्यात ११,४४,०००/- रू. किमतीचा ५७.२ ग्रॅम वजनाचा 'एमडी Mephedron' हा अंमली पदार्थ व आरोपी नामे आशिष गणेश आंबोकर याने आपले ताब्यात ३,००,०००/- रू. किमतीचा १५ ग्रॅम वजनाचा 'एमडी डमचीमकतवद' हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगला आहे. सदरबाबत मानपाडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्रमांक ७८८/२०२५ एन. डी. पी. एस. ॲक्ट ८(क), २२(क),२९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

३) दिनांक १५/०७/२०२५ रोजी १६.०० वाजताचे सुमारास गणेश घाट, गॅमन इंडीया पाईप लाईन जवळ, पारसिक सर्कलकडुन खारीगांव टोलनाक्याकडे जाणारे सर्व्हिस रोडवर कळवा, जि. ठाणे याठिकाणी आरोपी नामे राजेंद्र कुशधर महंत, वय २९ वर्षे, रा.ठि. गाव पलशकोपरी, कौनरीकाला, जि. केंदुझार, राज्य ओरीसा, हा एकुण रू. १२,१६,२००/- रू किमतीचा एकुण ४० किलो ५४० ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ बाळगताना असताना मिळून आला. सदरबाबत कळवा पोलीस स्टेशन गुन्हा नोंद क्रमांक ६३५/२०२५ एन.डी.पी.एस. कायदा कलम ८(क),२०(ब) पप(क) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

४) दिनांक १७/०७/२०२५ रोजी १६.०० वाजताचे सुमारास फकीशाहा दर्गाजवळ, खडीमशीन रोड, अमृतनगर, मुंब्रा याठिकाणी आरोपी नामे शोएब युसूफ शेख, वय ३२ वर्षे, धंदा-बेकार, रा.ठि. सात चाळ, रूम नं. ०१, सिम्बोसिस स्कुलजवळ, कौसा, मुंब्रा, ठाणे, हा एकुण रू. ४३,०२०/- रू किमतीचा एकुण ०१ किलो ४३४ ग्रॅम वजनाचा ''गांजा'' हा अंमली पदार्थ बाळगताना असताना मिळून आला. सदरबाबत मुंब्रा पोलीस स्टेशन गुन्हा नोंद क्रमांक १२३७/२०२५ एन. डी.पी.एस. कायदा कलम ८(क),२०(ब) पप(क) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वर नमुद केलेल्या ०४ कारवाईमध्ये जप्त करण्यात आलेला अंमली पदार्थाचे उत्पादन, विक्री, वाहतुक, साठवणुक यामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे ? याबाबतचा तपास चालू आहे.

सदरची कामगिरी श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.विनय घोरपडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध),गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राहुल मस्के, सपोनि/ निलेश मोरे, जगदशि गावित, पोउपनि/ राजेंद्र निकम, नितीन भोसले, पोहवा/ हरीष तावडे, अभिजीत मोरे, शिवाजी वासरवाड, विक्रांत पालांडे, शिवाजी रावते, हेमंत महाले, हुसेन तडवी, अमोल देसाई, नंदकिशोर सोनगिरे, अमित सकपाळ, अजय सकपाळ, चापोना/ अनुप राक्षे, मपोहवा/ शिल्पा कसबे, मपोशि/ कोमल लादे, पोशि/ प्रमोद जमदाडे, आबाजी चव्हाण यांनी केलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर